# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्रमांक ३०६/२०२४ दिनांक- १७/०८/२०२४.

**"घरफोडी करुन चोरी करणा-या साराईत आरोपीताला अटक करुन त्याच्याकडुन रोख रक्कम व मोबाईल फोन असे एकुण १,०३,०००/रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात काशीगांव पोलिस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश"**

दिनांक १५.०८.२०२४ रोजी फिर्यादी नांमे मोहम्मद फैजान फैजाज सिद्धिकी रा.ओम कॉप्लेक्स बिल्डींग नंबर १३ रुम नंबर ०३, बस स्टॉप नंबर २२, मिरारोड पुर्वे, ठाणे यांनी काशिगांव पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली कि, ते वरिल नमुद ठिकाणी त्यांच्या गांवातील मित्रांन सोबत वरिल नमुद ठिकाणी राहत आहे. दिनांक १३.०८.२०२४ रोजी रात्री ११.०० वा.नंतर ते त्यांच्या घरी त्यांच्या मित्रांन सोबत झोपले होते दिनांक १४.०८.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा.सुमारास ते झोपेतुन उठले असता त्यांना त्यांच्या घराचा दरवाज्या उघडा दिसला व घरातील सामान आस्तव्यस्त दिसले त्यावेळी त्यांनी त्यांचा मोबाईल फोन पाहिला असता तो त्यांना मिळुन आला नाही तेव्हा त्यांनी त्याच्या सोबत झोपलेले त्यांचे मित्र झियावुन,अरबाज व जॅकी यांना झोपेतुन उठवले असता त्यांनी सुद्धा त्यांचे मोबाईल फोन झोपण्याच्या बिछाण्यात पाहिले असता ते त्यांना मिळुन आले नाही त्यावेळी त्यांची खात्री झाली कि,कोणीतरी अनोळखी इसमाने रात्रीच्यावेळी त्यांच्या घरात प्रवेश करुण त्यांचे ०४ मोबाईल फोन व १२,०००/ रु.रोख रक्कम चोरी गेली आहे म्हणुन त्यांनी काशिगांव पोलिस स्टेशन येथे अनोळखी इसमा विरुध काशिगांव पोलिस स्टेशन गु.र.नं २३९/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०५,३३१(२),३३१(४) प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस ठाणेचे हद्दीत वारंवार मोबाईल चोरीच्या तक्रारी वाढल्याने वरिष्ठांनी आरोपीताचा शोध घेवुन नमुद गुन्हे उघड करण्याच्या सुचना दिल्या होत्या त्या प्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज जप्त केले तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुचे २५ पेंक्षा जास्त ठिकाणाचे सीटीटीव्ही फुटेज चेक करुण तसेच मोबाईल तांत्रिक विश्लेषणातुन नमुद गुन्ह्यात आरोपी नांमे **दुर्गेश प्रेमचंद गुप्ता,वय २४ वर्षे,पत्ता मुर्धाखाडी,साई बाब मंदीराजवळ,भाईंदर पश्चिम** यांस अटक केली आहे. नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांचे चोरी गेलेले महागडे मोबाईल फोन व रोख रक्कम तसेच आरोपीताने इतर वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केलेले विविध कंपनीचे मोबाईल असे **एकुण ०८ मोबाईल फोन व १०,७००/ रु.रोख रकक्म असे एकुण १,०३,०००/ रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

अटक आरोपी दुर्गेश गुप्ता हा घरफोडी ,जबरी चोरी इत्यादी गुन्हे करण्यात साराईत असुन त्याच्या विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्याचा अभिलेख पाहिला असता त्याच्या **विरुद्ध १० पेंक्षा जास्त गुन्हे दाखल आहे.**

वरिल नमुद गुन्ह्यातील अटक आरोपीताकडे पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक किरण बगडाणे व पोलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे,तपासी अंमलदार राहुल वाळुंज हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलिस आयुक्त, मिरारोड विभाग, राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलिस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलिस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.




**-------------0000-------------**